पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
CorelDRAW Ps Ai Id
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# जलजीवनचा कोट्यावधींचा घोटाळा उघड

## अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे सहा अधिकारी निलंबित




**जिल्हा परिषद अधिकाऱ्यांचे झालेले निलंबन चुकीचे असून ही कारवाई मागे घेण्यात यावी या मागणीसाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन सुरू केले आहे.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने केलेल्या जलजीवन योजनेच्या कामातही गंभीर त्रुटी, मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता आढळून आल्याने जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील कार्यकारी अभियंत्यासह सहा अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे.

जलजीवनच्या पाणीपुरवठा योजनेच्या कामात त्रुटी व आर्थिक अनियमितता आढळून आल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या चार अधिकाऱ्यांवर कारवाईनंतर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अधिकारीही निलंबित करण्यात आल्याने अहिल्यानगर जिल्ह्यात

### जिल्हा परिषदेच्या जलजीवन योजनांतही गंभीर त्रुटी



खळबळ उडाली आहे. जलजीवन बाबतची राज्यातील ही पहिलीच कारवाई आहे.

### निलंबितांची संख्या दहावर

**१) एस. एस. गडधे, तात्कालीन कार्यकारी अभियंता (प्र.), ग्रा.पा.पु. विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर. (सध्या कार्यरत उपअभियंता, ग्रा.पा.पु. उपविभाग, वेल्हा, जि.प. पुणे), २) पी. बी. जायभाये, तात्कालीन उप अभियंता, ग्रा.पा.पु. विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर, ३) पी. आर. संवत्ससकर, उप अभियंता, ग्रा.पा.पु. विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर, ४) डी. व्ही. परदेशी, तात्कालीन शाखा अभियंता, ग्रा. पा. पु. विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर, ५) एच. बी. चव्हाण, कार्यकारी अभियंता ग्रा.पा.पु.विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर, ६) आर. पी. पीसे उपअभियंता कोपरगाव. यापूर्वी चार अधिकारी निलंबीत करण्यात आले आहे.**

कोट्यावधी रुपये खर्च करुनही लोकांना जलजीवन योजनेच्या पाणी पुरवठा योजनांतून पाणी मिळाले नाही. यामुळे अखिल भारतीय मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष संभाजी दहातोंडे पाटील यांनी तक्रार केली होती. पहिल्या टप्प्यात तपासणीत निकृष्ट कामे, गंभीर त्रुटी, आर्थिक विषमता आढळल्याने जबाबदार धरुन व पुढील निपक्ष चौकशी करता यावी यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण योजनेचे कार्यकारी अभियंता, तत्कालीन कार्यकारी अभियंता, (पान २ वर)

# युसुफ चौगुले याच्यावर तात्काळ 'मकोका' अंतर्गत कारवाईची मागणी, विहिंपचे निवेदन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील आंबी खालसा येथील अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेणे, तिचे कथित धर्मांतर घडवून आणणे आणि तिच्यावर अत्याचार केल्याच्या गंभीर आरोपांतील मुख्य आरोपी युसुफ दादा चौगुले याच्याविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंध अधिनियम (मकोका) अंतर्गत तात्काळ कारवाई करावी, अशी जोरदार मागणी विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाचे पदाधिकारी विशाल भगवान वाकचौरे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

या प्रकरणात युसुफ चौगुले याला यापूर्वी न्यायालयाकडून जामीन मंजूर झाला होता. मात्र, जामिनावर असतानाच मध्यप्रदेशातील बडवाणी जिल्ह्यात त्याच्याकडून सहा पिस्तुले आणि जिवंत काडतुसे जप्त झाल्याप्रकरणी तेथील




### जामीन रद्द, शस्त्रसाठा, गुटखा तस्करी आणि पीडित कुटुंबाच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर

पोलिसांनी त्याला अटक केली. नव्याने समोर आलेल्या या शस्त्रास्त्र प्रकरणामुळे त्याच्या जामिनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. त्यानंतर संबंधित न्यायालयाने त्याचा जामीन रद्द करत त्याला तात्काळ न्यायालयीन कोठडीत घेण्याचे आदेश दिले. तसेच त्याच्याविरुद्ध प्रॉडक्शन वॉरंट जारी करून त्याला ताब्यात घेऊन संगमनेर न्यायालयासमोर हजर करण्याचे निर्देश दिल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह पॉक्सो कायद्याच्या कलम ८ व १२ तसेच शस्त्रास्त्र कायद्याच्या कलम (पान ४ वर)

# संगमनेरात छात्र भारतीचा विराट मोर्चा

## "शिक्षण आणि रोजगाराची हमी द्या"; MPSC ऑफलाइन परीक्षा, पोलीस भरती कॅलेंडरसह विविध मागण्यांसाठी विद्यार्थ्यांचा एल्गार







युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षार्थ्यांच्या भवितव्याशी निगडित प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी छात्र भारती संघटनेच्या वतीने शुक्रवारी संगमनेर शहरात विराट विद्यार्थी मोर्चा काढण्यात आला. छात्र भारतीचे राज्याध्यक्ष अनिकेत घुले यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे युवक-युवती, महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि विविध भागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शिक्षण आणि रोजगाराच्या प्रश्नांवर शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली.

हातात विविध मागण्यांचे फलक, बॅनर आणि तिरंगे झेंडे घेत विद्यार्थ्यांनी शहरातील प्रमुख मार्गांवरून प्रांत कार्यालयावर धडक दिली. जात धर्म की राजनीति बंद करो, शिक्षा रोजगार की बात करो, पेपर फुटते, स्वप्न तुटते, जात धर्म में नहीं बंटेंगे, मिलजुलकर संघर्ष करेंगे अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. विशेष म्हणजे या आंदोलनात विद्यार्थिनींचा सहभागही मोठ्या प्रमाणात होता.हा मोर्चा विद्यार्थ्यांच्या वाढत्या असंतोषाचा आणि संघटित शक्तीचा प्रत्यय देणारा ठरला. विद्यार्थ्यांनी शासनाकडे अनेक महत्त्वाच्या मागण्या मांडल्या. (पान २ वर)

### प्रमुख मागण्या...

**एमपीएससीच्या सर्व परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात.**
**पोलीस भरतीचे वार्षिक वेळापत्रक जाहीर करावे.**
**सर्व शासकीय भरती परीक्षा एमपीएससी मार्फत पारदर्शकपणे घेण्यात याव्यात.**
**नीट, टीईटी व इतर पेपरफोडी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी.**
**भरती प्रक्रिया वेळेत पूर्ण करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा.**

**आजचा विद्यार्थी केवळ नोकरीची मागणी करत नाही, तर पारदर्शक आणि विश्वासार्ह भरती व्यवस्था मागत आहे. वारंवार होणारी पेपरफोड, भरतीतील विलंब आणि नियोजनाचा अभाव यामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ सुरू आहे. शासनाने चझडउ परीक्षा ऑफलाइन घेऊन पोलीस भरतीचे वार्षिक कॅलेंडर जाहीर करावे, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी तडजोड थांबवावी. अन्यथा छात्र भारती राज्यभर तीव्र जनआंदोलन उभारेल.**

**अनिकेत घुले (राज्याध्यक्ष, छात्र भारती)**

ॲडव्हान्स गोल्ड एस.आय.पी. योजना
२०२६-२७
आजची छोटी बचत... उद्याची मोठी सोन्याची खरेदी!
आताच गोल्ड एस.आय.पी. सुरू करा आणि २०२७ च्या
अक्षयतृतीयेला आपल्या आवडीचे दागिने घरी न्या.
: उपलब्ध योजना :
मजुरी फ्री / एक्स्ट्रा बोनस एस.आय.पी.
फिक्स भाव बुकिंग एस.आय.पी.
फ्लेक्सिबल भाव बुकिंग एस.आय.पी.
SIP ऑनलाईन सुविधा उपलब्ध.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
ओममयूर ज्वेलर्स
OM MAYUR JEWELLERS
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% ते 70% डिस्काउंट सेल
लक्षवेधक आकर्षक गिफ्ट
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

PBM Jewellers
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
•विश्वास •शुद्धता •विविधता
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# विकास वाकचौरे यांच्या नियुक्तीबद्दल डॉ. सुजय विखे पाटील यांचा सत्कार



युवावार्ता (प्रतिनिधी)
अकोले- भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष माजी खासदार सुजय दादा विखे पाटील यांनी अकोले तालुक्यातील विकासराव वाकचौरे यांची जिल्हा नियोजन मंडळाच्या सदस्यपदी निवड केल्याबद्दल कार्यकर्त्यांनी सुजय विखे पाटील यांचा सन्मान केला.

लोणी येथील जनसेवा फाउंडेशन येथे अकोले तालुक्याचे आराध्य दैवत अगस्ती महाराज यांची प्रतिमा, टोपी, शाल देऊन माजी खासदार सुजय दादा विखे पाटील यांचा सन्मान करण्यात आला. अकोले तालुक्यामध्ये गेल्या अनेक वर्षापासून विखे पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून काम करणारे सुगाव गावचे विकास वाकचौरे यांची अहिल्यानगर जिल्ह्यातील अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या जिल्हा नियोजन मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. विकास वाकचौरे हे प्रवरा सहकारी दूध संस्थेचे माजी चेअरमन असून विखे पाटील यांच्या माध्यमातून अकोले तालुक्यातील सामाजिक राजकीय कार्यामध्ये त्यांचा नेहमी सहभाग असतो.

त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना जिल्हा नियोजन मंडळावर काम करण्याची संधी देण्यात आली आहे. सुजय विखे पाटील यांनी ही नियुक्ती करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली आहे. यावेळी सन्मान करताना शिवसेनेचे मच्छिंद्र धुमाळ, भाऊसाहेब वाकचौरे, राजाराम वाकचौरे, निखिल जगताप, रेश्मा गोडसे, दिलीपराव देशमुख, अमोल गोडसे यांच्यासह अनेक कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत वारीच्या माहितीपटाचे लोकार्पण



युवावार्ता (प्रतिनिधी)
मुंबई - माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर डिस्कव्हरी वाहिनी संयुक्तपणे निर्मित 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' या माहितीपटाचा आयनॉक्स चित्रपटगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'प्रीमियर शो ' झाला.

या 'प्रीमियर शो'साठी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, आमदार निरंजन डावखरे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, संचालक डॉ. किशोर गांगुर्डे, गोविंद अहंकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, उपसंचालक वर्षा आंधळे आदी उपस्थित होते. हा माहितीपट पंढरपूर वारीची प्रत्यक्ष अनुभूती देतो. या चित्रपटागृहामध्ये जणू काही पंढरपूरची वारी प्रत्यक्षात उतरली असल्याचेही अनुभव येत असल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या. 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' हा २२ मिनिटांचा माहितीपट वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यांच्या सहकार्याने तयार करण्यात आला आहे. या माहितीपटाचे मराठी, इंग्रजी, हिंदी, तमिळ, तेलगु, बंगाली, कन्नड, मल्याळम या भाषांमध्ये डबिंग करुन त्याचे डिस्कव्हरीच्या विविध उपग्रह वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात येत आहे. विविध भाषांमधील या माहितीपटाचे प्रसारण डिस्कव्हरी, डिस्कव्हरी एचडी, टीएलसी, टीएलसी एचडी, ॲनिमल प्लॅनेट, ॲनिमल प्लॅनेट एचडी, इन्व्हेस्टिगेशन डिस्कव्हरी (आयडी), डिस्कव्हरी सायन्स, डिस्कव्हरी टर्बो अशा ९ वाहिन्यांवरुन करण्यात येत आहे.

# अकोले नगरपंचायतीत भाजप आघाडीच्या गटनेतेपदी शेख



तम्मना मोसीन शेख

युवावार्ता (प्रतिनिधी)
अकोले - अकोले नगरपंचायतीच्या राजकारणात गुरुवारी एक अत्यंत अखेर मोठी आणि ऐतिहासिक घडामोड समोर आली आहे. सत्ताधारी भाजप आघाडीतील अंतर्गत धुसफूस चव्हाट्यावर आली. विद्यमान गटनेत्या तथा माजी नगराध्यक्ष सोनाली नाईकवाडी यांना मोठा धक्का बसला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार त्यांच्या जागी तमन्ना मोसीन शेख यांची भाजप आघाडीच्या नवीन गटनेतेपदी नियुक्ती करण्यात आली. या अनपेक्षित फेरबदलामुळे भाजप नेते, माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या समर्थकांनी थेट स्वपक्षातील विरोधकांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतल्याने तालुक्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नगरपरिषद प्रशासन शाखेचे सहआयुक्त डॉ. प्रदीप पठारे यांनी ९ जुलै २०२६ रोजी हा महत्त्वपूर्ण आदेश जारी केला. सौ. सोनाली नाईकवाडी यांनीच ११ मार्च २०२६ रोजी गटनेता बदलण्याबाबतचा प्रस्ताव दिला होता. यावर २१ जून रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात सविस्तर सुनावणी झाली. 'महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अर्हता नियम १९८७' नुसार हा बदल कायदेशीर ठरवत जिल्हा प्रशासनाने यावर शिक्कामोर्तब केले. या सुनावणीत नगरपंचायतीतील एकूण १२ नगरसेवकांचा समावेश होता. यामध्ये सागर चौधरी, प्रतिभा मनकर, हितेश कुंभार, वैष्णवी धुमाळ, जनाबाई मोहिते, माधुरी शेणकर, कविता शेळके आणि नवनियुक्त गटनेत्या तमन्ना शेख हे अर्जदार होते.

तर दुसरीकडे, विद्यमान नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, उपनगराध्यक्ष शरद नवले आणि शीतल वैद्य हे गैरअर्जदार होते. गेल्या काही महिन्यांपासून नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्षांच्या कार्यपद्धतीवर आघाडीतच तीव्र नाराजी होती, हेच या निकालावरून स्पष्ट झाले आहे.



नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे

**एकीकडे सत्ताधारी आघाडीत गटनेता बदलून सत्तासंघर्ष पेटला असतानाच, दुसरीकडे विद्यमान नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांच्या कथित भ्रष्टाचाराची चौकशी संगमनेरच्या उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत (प्रांत) अजूनही सुरूच आहे. या चौकशीच्या निकालाकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून, विरोधकांनीही या सर्व घडामोडींवर आपली नजर घट्ट केली आहे. गुरुवारी झालेला हा बदल म्हणजे अकोल्याच्या राजकारणाला नवे वळण देणाऱ्या एका वेगळ्याच अध्यायाची सुरुवात मानली जात आहे.**

## पान १ वरून-

# जलजीवनचा कोट्यावधींचा...

संगमनेर विभागाचे कार्यकारी अभियंता व नेवासा उपविभागाचे उपअभियंता असे चार अधिकारी निलंबित केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सोबत जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागानेही पाणी पुरवठा योजनांची कामे केली. जिल्हा परिषदेकडे जलजीवनच्या ८३० योजना आहेत. त्यापैकी सात सदस्य समितीने १० तालुक्यांतील ५३३ योजना पैकी १६ योजनांची खर्चाच्या अनुषंगाने व १५ योजनांची गुणवत्तेच्या दृष्टाने झालेल्या तपासणी गंभीर त्रुटी, आर्थिक मोठी तफावत आढळली आहे. ज्या योजनांवर मुख्य निरीक्षणे व स्ट्रक्चरल निरीक्षणे नोंदविण्यात आली तेथे तपासणीत निकृष्ट कामे, गंभीर त्रुटी, आर्थिक विषमता आढळल्याने जबाबदार धरुन व पुढील निपक्ष चौकशी करता यावी यासाठी अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील कार्यकारी अभियंता एच. बी. चव्हाण, तत्कालीन प्रभारी कार्यकारी अभियंता एस. एस. गडधे, उपअभियंता पी. आर. संवत्सरकर, उप अभियंता आर. पी. पीसे, तत्कालीन शाखा अभियंता डी. व्ही. परदेशी, तत्कालीन उपअभियंता पी. बी. जायभाये यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सचिव रंगा नायक यांनी निलंबित केले आहे.

शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी मिळूनही लोकांना जलजीलनच्या योजनांतून पाणी मिळाले नाही. कामे व्यवस्थित केली नाहीत. शिवाय खर्च केलेल्या पैशात व कामांत तफावत आढळणे गंभीर बाब आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालून अहिल्यानगर जिल्ह्यातील जलजीवनच्या कामाची चौकशी आणि कारवाई करत आहेत. या योजनेतून ज्या-ज्या अधिकाऱ्यांनी आर्थिक लाभ उठवला त्यांच्यावर कारवाई झालीच पाहीजे. आता काही लोकांवर कारवाई झाली, पण सर्व दोषींवर कारवाई व्हावी आणि शासनाचे कोट्यवधी रुपये वाया घातले. त्याची संबंधिताकडून वसुली झाली पाहिजे अशी मागणी आहे.

# संगमनेरात छात्र...

त्यामध्ये चझडउच्या सर्व परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात, पोलीस भरतीचे वार्षिक कॅलेंडर जाहीर करावे, सर्व शासकीय भरती परीक्षा चझडउमार्फत पारदर्शक पद्धतीने आयोजित कराव्यात, तसेच छएएढ, ढएढ आणि इतर पेपरफोडी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करून त्यांना कठोर शिक्षा द्यावी, अशा मागण्यांचा समावेश होता.

यावेळी विद्यार्थ्यांनी सांगितले की, राज्यातील लाखो युवक अनेक वर्षे स्पर्धा परीक्षांसाठी अथक मेहनत घेत आहेत. मात्र भरती प्रक्रिया वारंवार रखडणे, परीक्षा पुढे ढकलल्या जाणे, पेपरफोडीच्या घटना आणि नियोजनाचा अभाव यामुळे विद्यार्थ्यांचे आर्थिक, मानसिक आणि शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे भरती प्रक्रियेत पारदर्शकता, निश्चित वेळापत्रक आणि विश्वासार्हता निर्माण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मोर्चामुळे शहरातील प्रमुख मार्गांवर काही काळ वाहतुकीची कोंडी झाली. बसस्थानक परिसरातही वाहतुकीवर परिणाम झाला. मात्र पोलिसांच्या नियोजनामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही आणि आंदोलन शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात पार पडले.

मोर्चाच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले. शासनाने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही छात्र भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

# राज्यातील सर्व गेमिंग झोनचे सुरक्षा आणि फायर ऑडिट होणार

मुंबई (वृत्तसंस्था)
मुंबईसह राज्यातील सर्व मॉलमधील गेमिंग झोनमध्ये नागरिकांच्या, विशेषतः लहान मुलांच्या सुरक्षेचे निकष काटेकोरपणे पाळले जात आहेत का, याचा व्यापक आढावा घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्यातील सर्व गेमिंग झोनचे सविस्तर सुरक्षा आणि फायर ऑडिट करण्याचे निर्देश संबंधित महानगरपालिका आयुक्तांना दिले जातील, अशी घोषणा उद्योग मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी विधानपरिषदेत केली. या राज्यव्यापी आढाव्याचा सविस्तर अहवाल आगामी अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुंबईतील मॉल्समधील सुरक्षेचे निकष न पाळणाऱ्या गेमिंग झोनविरुद्ध कठोर कारवाई करण्याबाबत नियम ९२ अन्वये आमदार उमा खापरे यांनी सभागृहात चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते. या चर्चेत आमदार परिणय फुके आणि अमित गोरखे यांनीही सहभाग घेतला. मुंबईतील मॉलच्या सद्यस्थितीबाबत माहिती देताना मंत्री सामंत म्हणाले की, मुंबईतील ६८ मॉलची प्रशासनामार्फत प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी ४७ मॉलमध्ये आवश्यक ती अग्निसुरक्षा यंत्रणा योग्य स्थितीत आढळून आली. मात्र, १८ मॉलमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर त्रुटी आढळल्याने त्यांना १२० दिवसांची कायदेशीर नोटीस देण्यात आली होती. त्यानंतर संबंधित मॉल चालकांनी स्प्रिंकलर, स्मोक डिटेक्शन यंत्रणेसह आवश्यक त्या सर्व सुरक्षा उपायांची पूर्तता केल्यानंतरच त्यांना पुन्हा परवानगी देण्यात आली आहे. उर्वरित तीन मॉल सध्या बंद असल्याने त्यांच्याविरुद्ध कारवाईचा प्रश्न उद्भवला नाही, असे त्यांनी नमूद केले.

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL
Daily Yuvavarta




# बदलत्या काळातील पालकत्व



भारतातील कुटुंबव्यवस्था, जीवनशैली आणि सामाजिक परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. या बदलांचा सर्वाधिक प्रभाव जर कोणत्या क्षेत्रावर पडत असेल, तर तो म्हणजे बालसंगोपन आणि पालकत्वाच्या पद्धतींवर. काही वर्षांपूर्वीपर्यंत मुलांच्या संगोपनाचा अर्थ चांगले शिक्षण, शिस्त आणि सुरक्षित नोकरी एवढ्यापुरताच मर्यादित होता. मात्र, आजचे पालक मुलांच्या सर्वांगीण विकासाला अधिक महत्त्व देत आहेत. शिक्षणासोबतच खेळ, कला, छंद, व्यक्तिमत्त्व विकास आणि मानसिक आरोग्य याकडेही ते तितक्याच गांभीर्याने पाहत आहेत.

पूर्वीच्या पिढीतील पालकांचा भर मुख्यतः मुलांनी चांगले गुण मिळवावेत, उच्च शिक्षण घ्यावे आणि स्थिर नोकरी मिळवावी यावर असायचा. डॉक्टर, अभियंता, सरकारी अधिकारी किंवा बँक कर्मचारी अशा पारंपरिक व्यवसायांना सर्वाधिक प्राधान्य दिले जात असे. मुलांच्या आवडी-निवडींपेक्षा समाजात प्रतिष्ठा आणि आर्थिक स्थैर्य याला अधिक महत्त्व दिले जात होते. त्यामुळे अनेक मुलांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्याची संधी मिळत नसे.

परंतु आजची परिस्थिती वेगळी आहे. आधुनिक पालक आपल्या मुलांच्या क्षमता, कलागुण आणि स्वप्नांना अधिक महत्त्व देत आहेत. मुलांना त्यांच्या आवडीचे क्षेत्र निवडण्याचे स्वातंत्र्य दिले जात आहे. क्रीडा, संगीत, अभिनय, चित्रकला, डिजिटल मीडिया, उद्योजकता, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञान यांसारख्या नव्या क्षेत्रांकडेही पालक सकारात्मक दृष्टीकोनातून पाहत आहेत. त्यामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढण्यास मदत होत आहे.

याचबरोबर पारंपरिक आणि धार्मिक मूल्यांवर दिला जाणारा भर काही प्रमाणात कमी होत असल्याचे दिसून येते. आधुनिक जीवनशैली, जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानामुळे मुलांचे विचारविश्व अधिक व्यापक झाले आहे. पालक आता मुलांना केवळ परंपरा सांगण्यावर भर न देता, त्यामागील तत्त्वे आणि मूल्ये समजावून सांगण्याचा प्रयत्न करत आहेत. यामुळे मुलांमध्ये विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता विकसित होत आहे.

मात्र, बदलत्या पालकत्वासमोर काही नवीन आव्हानेही उभी राहिली आहेत. त्यामध्ये सर्वात मोठे आव्हान म्हणजे मोबाईल फोन आणि सोशल मीडियाचे वाढते व्यसन. स्मार्टफोन, ऑनलाइन गेम्स आणि सोशल मीडिया यांचा मुलांच्या आयुष्यातील वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अनेक मुले दिवसातील अनेक तास स्क्रीनसमोर घालवत असल्याने त्याचा परिणाम त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होत आहे. एकाग्रता कमी होणे, चिडचिड वाढणे, झोपेच्या समस्या आणि सामाजिक संवादात घट होणे यांसारखे परिणाम दिसून येत आहेत.

सोशल मीडियावरील अयोग्य मजकूर, सायबर गुन्हे आणि ऑनलाइन फसवणूक यामुळेही पालक चिंतेत आहेत. मुलांच्या डिजिटल सुरक्षेची जबाबदारी आता पालकांसमोर मोठे आव्हान बनली आहे. त्यामुळे अनेक पालक मुलांच्या स्क्रीन टाइमवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. काही कुटुंबांमध्ये मोबाईल वापरासाठी वेळेची मर्यादा निश्चित केली जात आहे, तर काही पालक मुलांसोबत अधिक वेळ घालवून त्यांना प्रत्यक्ष उपक्रमांकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहेत. शहरी भागातील पालक मुलांच्या शारीरिक सुरक्षेबाबत आणि वाढत्या प्रदूषणाबाबतही चिंतित आहेत. वाढते शहरीकरण, वाहतुकीची समस्या आणि खुल्या खेळाच्या मैदानांचा अभाव यामुळे मुलांचा नैसर्गिक शारीरिक विकास प्रभावित होत आहे. त्यामुळे पालक आता मुलांना खेळ, योग, व्यायाम आणि मैदानी उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करत आहेत.

दक्षिण भारतातील अनेक कुटुंबांमध्ये पालकत्वाबाबत अधिक उदार आणि खुला दृष्टिकोन दिसून येतो.

# महाराष्ट्रात लवकरच समान नागरी कायदा अस्तित्वात येणार - मुख्यमंत्री

मुंबई (वृत्तसंस्था)
महाराष्ट्रातील महायुती सरकारने राज्यात समान नागरी कायदा लागू करण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. गुरुवारी विधानसभेत महत्त्वपूर्ण घोषणा करताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील णउउ साठी नियम आणि आराखडा तयार करण्यासाठी एका उच्चस्तरीय समितीची स्थापना जाहीर केली. या सात-सदस्यीय तज्ज्ञ समितीचे नेतृत्व करण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांच्यावर सोपवण्यात आली आहे.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केलेल्या सात-सदस्यीय समितीत कायदा, प्रशासन आणि समाजसेवा या क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्तींचा समावेश आहे. या समितीत सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांचे तीन माजी न्यायाधीश, एक घटनातज्ज्ञ, एक माजी वरिष्ठ सनदी अधिकारी (ब्युरोक्रॅट) आणि सामाजिक क्षेत्रातील दोन मान्यवरांचा समावेश आहे.

या समितीच्या सदस्यपदी न्यायमूर्ती रंजना देसाई (अध्यक्ष): सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश.न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण: उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश., न्यायमूर्ती एस. जी. मेहरे: उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश., डी. के. जैन: महाराष्ट्राचे माजी मुख्य सचिव (प्रशासकीय तज्ज्ञ). वीरेंद्र सराफ: महाराष्ट्राचे माजी महाधिवक्ता (घटनातज्ज्ञ). रमेश पतंगे: प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते आणि पद्मश्री पुरस्कार विजेते. सुवर्णा रावळ: सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्या असणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, ही सात-सदस्यीय समिती समान नागरी कायद्याशी संबंधित सर्व कायदेशीर, सामाजिक आणि प्रशासकीय बाबींचा सविस्तर अभ्यास करेल आणि पुढील सहा महिन्यांत आपल्या शिफारशींसह राज्य सरकारला अहवाल सादर करेल. समितीच्या अहवालाच्या आधारे सरकार समान नागरी कायद्याचा मसुदा तयार करेल.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, नागपूर येथील आगामी हिवाळी अधिवेशनात विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहांमध्ये समान नागरी कायद्याचे विधेयक मांडण्याचा आणि ते मंजूर करून घेण्याचा प्रयत्न राज्य सरकार करेल. राज्यात समान नागरी संहिता लागू करण्याच्या दिशेने ठोस आणि प्रभावी पावले उचलली जावीत, यासाठी सरकार सर्व आवश्यक घटनात्मक आणि कायदेशीर प्रक्रियेचे पालन करूनच या विषयावर पुढील कार्यवाही करेले.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# हिंदी ही केवळ भाषा नाही, तर रोजगाराचे प्रभावी माध्यम - डॉ. नवले



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : संगमनेर महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सुरू झाले असून, हिंदी विभाग (पदवी, पदव्युत्तर तसेच संशोधन केंद्र) यांच्या वतीने सर्व वर्गांच्या हिंदी मेजर विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी 'हिंदी भाषा व रोजगाराच्या संधी' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून सात्रळ महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि हिंदी विभागप्रमुख डॉ. भाऊसाहेब नवले, प्रवरा महाविद्यालय, लोणी येथील डॉ. दशरथ खेमनर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. अरुण गायकवाड, उपप्राचार्य प्रो. डॉ. रवींद्र ताशिलदार, हिंदी विभागप्रमुख प्रो. डॉ. जितेंद्र पाटील तसेच विभागातील प्राध्यापक प्रो. डॉ. सचिन कदम, डॉ. सुनील चव्हाण, डॉ. शरद शिरोळे, प्रा. निलेश गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख व्याख्याते डॉ. नवले यांनी सांगितले की, हिंदी ही केवळ भाषा नसून संपूर्ण भारतामध्ये रोजगार उपलब्ध करून देणारी भाषा आहे. विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेच्या माध्यमातून कौशल्याधिष्ठित शिक्षण घेतले तर त्यांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होतील. हिंदी भाषा केवळ राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही गौरव प्राप्त करीत आहे. विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेच्या माध्यमातून रोजगाराभिमुख शिक्षण घ्यावे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख पाहुणे डॉ. दशरथ खेमनर यांनीही भाषा आणि शब्दांच्या प्रभुत्वामुळे निवेदनासारख्या विविध क्षेत्रांमध्ये तसेच अनुवाद अधिकारी मिडिया निवेदक,पटकथा लेखक ,जाहिरात लेखक अश्या रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध असल्याचे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी आपल्या मातृभाषेबरोबरच हिंदी भाषेचाही सराव करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. आज विविध जनसंचार माध्यमांमध्ये युवकांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचा आधार घ्यावा असे ते म्हणाले.

प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अरुण गायकवाड यांनी प्रमुख अतिथींचे स्वागत करून हिंदी विभागाने आयोजित केलेल्या विशेष व्याख्यान उपक्रमाचे कौतुक केले. हिंदी भाषा ही रोजगाराभिमुख भाषा असून विद्यार्थ्यांनी तिच्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे मार्गदर्शन त्यांनी केले. कला शाखेचे उपप्राचार्य प्रो. डॉ. रवींद्र ताशिलदार यांनीही हिंदी भाषा आज जगातील सर्वश्रेष्ठ भाषांपैकी एक म्हणून ओळखली जात असून, हिंदी विभागातील विद्यार्थ्यांनी या भाषेच्या माध्यमातून स्वतःचा सर्वांगीण विकास करावा, यासाठी प्रेरित केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभागप्रमुख प्रो. डॉ. जितेंद्र पाटील यांनी केले. त्यांनी सर्व मान्यवरांचे तसेच हिंदी विभागात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे हार्दिक स्वागत करून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रो. डॉ. सचिन कदम यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. शरद शिरोळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. निलेश गायकवाड, श्री आबा शिंदे तसेच हिंदी विभागातील विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# तालुक्यातील नागरीकांना टोल वसुलीत सुट द्या - ग्राहक पंचायत



युवावार्ता(प्रतिनिधी)

अकोले - अकोले आदिवासी तालुक्यातील नागरिकांना वन्यजीव विभागाच्या टोल नाक्यावर होणारी वसूलीत निशुल्क प्रवेश मिळण्याबाबतचे निवेदन अकोले तहसीलचे महसूल विभागाचे नायब तहसिलदार प्रमोद सावंत यांना दिल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छींद्र मंडलीक, कार्याध्यक्ष महेश नवले, सचिव राम रुद्रे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की अकोले आदिवासी तालुक्यातील सर्व सामान्य, ज्येष्ठ नागरीक, महिला, मुले, अपंग इत्यादींना हरिश्चंद्रगड, वन्यजीव परिक्षेत्रात प्रवेश आणि पार्किंगसाठी वन्यजीव विभागाकडून टोलनाक्यावर इतर्स पर्यंटकांप्रमाने रक्कम आकारण्यात येते. तसेच ही बाब अकोले तालुक्यातील सर्व सामान्य नागरीक भूमिपुत्रांवर अन्यायकारक व जाचक आहे.अकोले तालुक्याच्या जडनघडणीत अनेक स्वंतत्र सैनिक, भुमिगत सैनिक अनेकांचे मोठे योगदान आहे. व इतिहास आहे. अकोले तालुक्यातील हरिश्चंद्रगड, अमृतेश्वर मंदिर दर्शन, सांदनदरी, कळसुबाई, घाटघर, घाटन देवी इत्यादी ठिकानी अकोले आदिवासी तालुक्यातील नागरीक दर्शनासाठी, पर्यटनासाठी जात असतात. वन्यजीव विभागाकडून तपासणी नाक्यांवर प्रत्येक व्यक्तीसाठी वाहनासाठी शुल्कवसुल केले जाते. तालुक्यातुन फिरायला व दर्शनाला तालुक्यातील लोकांनाच कर रक्कम भरावा लागतोय ही बाब अतिशय क्लेशदायक व अर्थिक अन्यायकारक व मानसिक त्रासदायक आहे. अकोले भंडारदरा वन्यजीव परिक्षेत्रातील कोणत्याही तपासणी नाक्यावर अकोले तालुक्यातील स्थानिक नागरीकांकडून, रहिवाशांकडून प्रवेश शुल्क व पार्किंग शुल्क घेऊ नयेत वरील बाबींचा सहानुभुती पूर्वक विचार व्हावा अन्यथा अकोले तालुक्यातील नागरीक रस्ता रोको आंदोलन, व इतर्स मार्गाचा अवलंब करतील याची दखल घ्यावी असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, कार्याध्यक्ष महेश नवले, तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर, सचिव राम रुद्रे, भगवान करवर, विश्वास देशमुख, प्रकाश कोरडे, रामदास पांडे, भाऊसाहेब आभाळे, दत्ता ताजणे, रजनीकांत भांगरे, सखाराम खतोडे, बबनराव तिकांडे, रामहारी तिकांडे, ज्ञानेश्वर पुंडे, शुभम माने, सखाहारी पांडे आदिंच्या सह्या आहे.

# श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाच्या सीईओ निवड समितीवर डॉ. हावरे

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अयोध्येतील श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निवड समितीवर डॉ. सुरेश हावरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मंदिर व्यवस्थापनाचा सखोल अभ्यास, मोठ्या धार्मिक संस्थेच्या यशस्वी प्रशासनाचा अनुभव आणि पारदर्शक कारभाराची ओळख यामुळे ही नियुक्ती महत्वाची मानली जात आहे.

प्रख्यात अणुशास्त्रज्ञ, उद्योजक आणि श्री साईबाबा संस्थानचे माजी अध्यक्ष म्हणून देशभर परिचित असलेल्या डॉ. हावरे यांनी शिर्डीतील कार्यकाळात अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम संस्थानच्या राबवून व्यवस्थापनाला आधुनिक, शिस्तबद्ध आणि भक्ताभिमुख स्वरूप दिले. त्यांच्या अध्यक्षपदाच्या काळात साजरे झालेले श्री साई समाधी शताब्दी वर्ष देश-विदेशात विशेष गाजले. राष्ट्रपती आणि



पंतप्रधानांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्याचे नियोजन आणि

व्यवस्थापनाचे कौतुक झाले होते. डॉ. हावरे यांच्या नेतृत्वाखाली प्रसादालयाचा विस्तार, रुग्णालयाचे आधुनिकीकरण, शिक्षण संकुलाची उभारणी, अद्ययावत दर्शनरांग, हजारो भाविकांसाठी निवास व्यवस्था, रक्तदान चळवळ, भाविकांना मंदिर सेवेत सहभागी करून घेणारी योजना, नभोवाणी केंद्र, विमानतळ विकास आणि 'स्वच्छ शिर्डी'सारखे अनेक राबविण्यात आले. विदर्भातील एका छोट्या गावातून शिक्षण घेतलेले डॉ. हावरे यांनी भाभा अणुशक्ती केंद्रात २७ वर्षे संशोधक म्हणून कार्य केले. त्यानंतर बांधकाम क्षेत्रात त्यांनी स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. उपक्रम यशस्वीपणे

मंदिर व्यवस्थापन हा त्यांचा विशेष अभ्यासाचा विषय आहे. 'मंदिर व्यवस्थापन' या पुस्तकातून त्यांनी भारतीय मंदिरांच्या स्वच्छ, भ्रष्टाचारमुक्त, भक्ताभिमुख आणि समाजोपयोगी व्यवस्थापनाची संकल्पना मांडली आहे.

# अखंड चिंतन विठू माऊलीचे...

पंढरीची वारी ही केवळ पंढरपूरपर्यंत चालत जाण्याचा प्रवास नाही, तर स्वतःला बदलण्याचा, अंतर्मनाचा शोध घेण्याचा आणि आपल्या आतल्या आवाजाशी संवाद साधण्याचा आध्यात्मिक प्रवास आहे. या संपूर्ण प्रवासात वारकऱ्यांच्या मनात, ओठांवर आणि श्वासात अखंड चिंतन असते ते फक्त विठू माऊलीचे. प्रत्येक वारकऱ्याच्या मुखी एकच शब्द असतो-माऊली.

**संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात-**
**गीता भागवत करिती श्रवण।**
**अखंड चिंतन विठोबाचे।।**

वारकरी घरातून निघाल्यापासून पंढरपूरपर्यंत प्रत्येक क्षणी विठ्ठलाचे नामस्मरण करीत असतो. ही भक्ती केवळ वर्णनापुरती नसते, तर ती अंतःकरणातून उमटलेली असते. ह.भ.प. धुंडामहाराज यांनी भक्तीचे स्वरूप स्पष्ट करताना एक सुंदर उदाहरण दिले होते. ते म्हणाले, पतिव्रता, पतिव्रता असे नुसते म्हणत राहिल्याने स्त्री पतिव्रता होत नाही. संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात-

**पहा पहा अनुरागे भजे।**
**जे प्रियोत्तमे मानिजे।**
**ते पती होऊनि काय न वानिजे।।**

पत्नीच्या आचरणातून पतीला वाटले पाहिजे की ती खरोखर पतिव्रता आहे. त्याचप्रमाणे, मी भक्त आहे असे म्हणून कोणी भक्त होत नाही. खरा भक्त स्वतःला भक्त म्हणवून घेण्याच्या भानगडीत पडत नाही. भगवद्गीतेतही म्हटले आहे-

**स महात्मा सुदुर्लभः.**

ज्याची आपण भक्ती करतो, त्या परमेश्वरालाच वाटले पाहिजे की हा माझा भक्त आहे. अशी भक्ती देवाला भक्ताचा आणि भक्ताला देवाचा अनुभव देणारी ठरते.

पालखी सोहळ्यात सहभागी होणारा प्रत्येक वारकरी देहभान विसरतो. त्याच्या ओठी फक्त विठ्ठलाचे नाम आणि हृदयात विठू माऊलीचे चिंतन असते. हीच खरी भक्ती विठ्ठलाला भावते. आषाढी एकादशीला प्रत्यक्ष विठ्ठलाचे दर्शन झाले नाही, तरी मंदिराच्या कळसाचे दर्शन घेऊन धन्य होणारे भक्त विठ्ठलाला अधिक प्रिय असतात. कारण त्यांचे चिंतन, मनन, श्रवण आणि स्मरण हे फक्त विठ्ठलासाठीच असते.

एकदा पालखी सोहळ्यात एका व्यक्तीने वारकऱ्याला



विचारले, इतके लोक कशासाठी जमले आहेत? तुम्हाला मुक्ती हवी आहे का? त्यावर वारकरी म्हणाला, आम्हाला मुक्ती नको. आम्ही विठू माऊलीचे भक्त आहोत. आम्ही प्रापंचिक आहोत. आम्हाला धन नको, मुक्ती नको; फक्त संतसंग हवा. संतांचा सहवास आणि पंढरीच्या पांडुरंगाचा रंग आम्हाला लाभावा, एवढीच आमची इच्छा आहे.

विठ्ठलाचे चिंतन म्हणजे त्याच्या नावात, त्याच्या विचारात आणि त्याच्या भक्तीत पूर्णपणे तल्लीन होणे. जेव्हा हे चिंतन मनापासून घडते, तेव्हा जीवनात शांतता, भक्तीची ऊर्जा आणि आंतरिक आनंद निर्माण होतो. विठ्ठल... विठ्ठल... या दोन शब्दांच्या अखंड जपातून मनःशांती लाभते. भक्तांच्या हाकेला धावून जाणारी ही प्रेमळ विठू माऊली आहे.

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात-

**विठ्ठल ही चित्ती।**
**गोड लागे गाता गीती।।**
**आम्हा विठ्ठल जीवन।**
**टाळा चिपळ्या धन।।**
**विठ्ठल विठ्ठल वाणी।**
**अमृत हे संजीवनी।।**
**रंगला या रंगे।**
**तुका विठ्ठल सर्वांगे।।**

तुकाराम महाराज सांगतात की विठ्ठलाचे नाव आणि त्याचे चिंतन आम्ही हृदयात साठवले आहे. आमचे जीवन म्हणजेच विठ्ठल आहे. टाळ आणि चिपळ्या हेच आमचे खरे धन आहे. विठ्ठल... विठ्ठल... हेच आमचे अमृत आणि संजीवनी आहे. आमचे सर्वांग विठ्ठलाच्या प्रेमरंगात रंगून गेले आहे.

**पुढे ते म्हणतात-**
**चित्ती बैसले चिंतन।**
**नारायण नारायण।।**

म्हणजेच मनात सतत ईश्वराचे नामस्मरण आणि त्याचे अखंड चिंतन असावे. आजही लाखो वारकरी आपल्या घरातून पंढरीच्या पांडुरंगाच्या भेटीसाठी पायी निघतात. त्यांच्या मनात थंडी, पाऊस, वादळ किंवा कष्ट यांची चिंता नसते. कारण त्यांच्या हृदयात असते फक्त पांडुरंगाचे चिंतन. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे प्रस्थान होताच इंद्रायणी नदीचा पूर ओसरला आणि वारकऱ्यांसाठी वाट मोकळी झाली. लाखो वारकऱ्यांच्या भक्तीला आणि हाकेला विठू माऊलीने दिलेला हा जणू दैवी प्रतिसादच होता.

खरे तर पालखी सोहळा शब्दांत मांडणे अशक्य आहे; तो अनुभवण्याचा विषय आहे. मलाही हा दिव्य अनुभव घेण्याचे भाग्य लाभले आणि मी धन्य झालो.

**एक सुंदर विचार सांगतो-**

चिंता जिवंत माणसाला खलास करते आणि चिता मेलेल्या माणसाला; पण विठू माऊलीचे चिंतन माणसाच्या जीवनात चैतन्य, उत्साह आणि आनंद निर्माण करते.

हे एकदा उमगले की जगण्याचा संपूर्ण मार्ग आनंदमय होतो. म्हणूनच वारकरी संप्रदाय आपल्याला शिकवतो-जीवनात चिंता नको, अखंड विठ्ठल चिंतन हवे. कारण जिथे विठ्ठलाचे नाम आहे, तिथेच खरी शांती, समाधान आणि जीवनाचा परमानंद आहे.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**


महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## ई निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती, औ.वि. केंद्र परळी– वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई–निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम /बयाना रक्कम | ई–निविदा विक्रीचा कालावधी | ई–निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई–निविदा क्र ३००००७०३८७ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ कोल मिल डिसचार्ज पाइप ओरिफिसेस रीक्वायर्ड फॉर कोल मिल बीबीडी–४७७२ ड्यूरिंग अॅन्युअल ओवरहौल अॅट बीएम–१, २५०मे.वॅट , टीपीएस, परळी वै. | ७.२६ लाख १०७६०/– | १०.०७.२०२६ ते १७.०७.२०२६ | १८.०७.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७०४०३ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ एक्सप्लोजन वेंट फॉर बीबीडी ४७७२ कोल मिल ड्यूरिंग यू ७ ओवरहौल अॅट बीएम १ ,२५०एमडब्ल्यू, टीपीएस परळी वै. | ४.३८ लाख ७८८०/– | १०.०७.२०२६ ते १७.०७.२०२६ | १८.०७.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७०१३२ | प्रॉक्यूरमेंट ऑफ कोल मिल एक्सआरपी–९०३ जर्नल असेम्ब्ली मेटल क्लॅडेड ऑइल सिल्स रीक्वायर्ड अॅट बीएम–२, यू–८, टीपीएस परळी वै. | ५.५४ लाख ९०४४/– | १०.०७.२०२६ ते १७.०७.२०२६ | १८.०७.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६९०६७ (आर) | सप्लाय ऑफ होल्ड बॅक्स फॉर गियरबॉक्स इंस्टॉलड अॅट सीएचपी–१, २५० मे. वॅट. टीपीएस, परळी वै. | ८.५९ लाख १२०९५/– | १०.०७.२०२६ ते २५.०७.२०२६ | २६.०७.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७०२०१ (आर) | सप्लाय अँड कंप्लीट ओवरहौल ऑफ व्हील लोडर इंजिन मॉडेल नं.६५६ अॅट सीएचपी–१, २५० मे.वॅट. टीपीएस, परळी वै. | ६.७७ लाख १०२७९/– | १०.०७.२०२६ ते २५.०७.२०२६ | २६.०७.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७०३२४ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ डीएम मेक पंप अँड सीडब्ल्यू मेक अप पंप स्पेयर्स ड्यूरिंग सीओएच अॅट टीएम–२, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | १५.१३ लाख १८६३२/– | १०.०७.२०२६ ते २५.०७.२०२६ | २६.०७.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७०१४१ (आर) | सॅच्युटरी वर्क ऑफ कॅरिंग आऊट द वर्क ऑफ प्रीप्रेशन अँड सबमिशन ऑफ ईयरली बेस्ड फॅक्टरी रिलेटेड सेफ्टी रिपोर्ट्स, ऑन साइट एमर्जन्सि , हजार्ड अँड ओपेराबिलिटी स्टडी अँड रिस्क अनॅलिसिस , प्लॅन अँड एक्सटर्नल सेफ्टी ऑडिट अॅज पर आयएस:१४४८९ ऑफ टीपीएस, परळी यू–६,७ अँड८. | १७.०८ लाख २०५८०/– | १०.०७.२०२६ ते ३१.०७.२०२६ | ०१.०८.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६९३६७ | प्रॉक्यूरमेंट ऑफ 'ईएसपी अँड सिलो फ्लूइडायझिंग एयर ब्लोवर स्पेयर पार्ट्स' फॉर ड्राय फ्लाय अॅश इव्हॅक्युएशन अँड कनव्हेईंग सिस्टिम अॅट एएचपी यू–८, टीपीएस, परळी वै. | ८.०२ लाख ११५२१/– | १०.०७.२०२६ ते ३१.०७.२०२६ | ०१.०८.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६९४९२ | वर्क ऑफ बफर हॉपर टॉप डोम हाइट एक्सटेन्शन अँड अलाईड वर्क्स फॉर ड्राय फ्लाय अॅश इव्हॅक्युएशन सिस्टिम अॅट एएचपी–१, टीपीएस, परळी वै. | १०.२० लाख १३७००/– | १०.०७.२०२६ ते ३१.०७.२०२६ | ०१.०८.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६९८२८ | सप्लाय ऑफ टेस्टिंग रिएजेंट फॉर ऑइल टेस्ट सेंटर मशीन अॅट डब्ल्यूटीपी–१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | २५.४२ लाख २८९२२/– | १०.०७.२०२६ ते ३१.०७.२०२६ | ०१.०८.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६९८८० | वर्क्स फॉर कंप्लीट ओवरहौलिंग ऑफ सीडब्ल्यू अँड एसीडब्ल्यू पंप्स अॅज अँड व्हेन रीक्वायर्ड अॅट टीएम–१, २५० मे.वॅट. टीपीएस, परळी वै. | १५.०१ लाख १८५१९/– | १०.०७.२०२६ ते ३१.०७.२०२६ | ०१.०८.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६९८९६ | सप्लाय ऑफ फाइन केमिकल्स फॉर डब्ल्यूटीपी–२, २५० मे.वॅट. टीपीएस, परळी वै. (Brand names: Qualigens, Emerck, Thermofisher scientific, Rankem, SD fine Chemicals) | १६.९९ लाख २०४९१/– | १०.०७.२०२६ ते ३१.०७.२०२६ | ०१.०८.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६९९२९ | टू इयर अॅन्युअल वर्क काँट्रॅक्ट फॉर प्रोव्हायडिंग सर्विसेस ऑफ क्लोज्ड एसी फोर व्हीलर महिंद्रा बोलेरो /टीयूव्ही/टाटा सुमो /इक्वीवॅलेण्ट वेहिकल ऑन डेलि हायर बेसिस फॉर सेक्युर्टी स्टाफ अॅट सीएचपी–२–व्ही/एम , २५० मे.वॅट. टीपीएस, परळी वै. | ४०.४४ लाख ४३९५०/– | १०.०७.२०२६ ते ३१.०७.२०२६ | ०१.०८.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७००९४ | टू इयर अॅन्युअल वर्क काँट्रॅक्ट फॉर मटेरियल हँडलिंग (i.e. अनलोडिंग /लोडिंग/ शिफटिंग ऑफ मटेरियल) अँड वर्क असिस्टंस बाय प्रोव्हायडिंग अन स्किलड सर्विसेस अॅट मेजर स्टोर(टीपीएस अँड एनपीटीपीएस) परळी वै. | ११८.२४ लाख १२१७४६/– | १०.०७.२०२६ ते ३१.०७.२०२६ | ०१.०८.२०२६ |

वरील तारीखेस ई–निविदा विक्री सुरू होण्याची वेळ ११:०० व ई–निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे.सर्व निविदा करिता निविदा किंमत रु. ११८०/– (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती: मुख्य अभियंता, टीपीएस परळी–वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्याः https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक ८४११९७१५२५

मुख्य अभियंता

## संपादकीय...

### वाहतूक कोंडी : वाढत्या शहरांसमोरील मोठे आव्हान

शहरे वाढत आहेत, लोकसंख्या वाढत आहे, वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे; मात्र त्याच वेगाने रस्ते, पार्किंग व्यवस्था आणि वाहतूक नियोजन विकसित होताना दिसत नाही. परिणामी, वाहतूक कोंडी ही केवळ महानगरांची समस्या राहिलेली नसून ती आता मध्यम आणि लहान शहरांसमोरही उभी ठाकलेली गंभीर समस्या बनली आहे. सकाळी कामावर जाण्याच्या आणि सायंकाळी घरी परतण्याच्या वेळेत रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. याचा थेट परिणाम नागरिकांच्या वेळेवर, आरोग्यावर आणि अर्थव्यवस्थेवर होत आहे. वाहतूक कोंडीची अनेक कारणे आहेत. शहरांमध्ये वाढणारी वाहनसंख्या हे त्यातील प्रमुख कारण आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम नसल्यामुळे अनेकजण खाजगी वाहनांचा वापर करणे पसंत करतात. त्यातच अरुंद रस्ते, अपुरे पार्किंग, अनधिकृत अतिक्रमणे, रस्त्यावरील फेरीवाले आणि वाहतुकीच्या नियमांचे होणारे उल्लंघन यामुळे परिस्थिती अधिकच बिकट होते. अनेक ठिकाणी रस्त्यांच्या कामांमुळे किंवा विकास प्रकल्पांमुळे वाहतुकीचा वेग मंदावतो आणि कोंडीची समस्या वाढते. वाहतूक कोंडीचे परिणाम केवळ वेळेच्या नुकसानीपुरते मर्यादित नाहीत. वाहनांच्या लांब रांगांमुळे इंधनाचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. त्यामुळे नागरिकांच्या खर्चात वाढ होते. त्याचबरोबर वाहनांमधून होणारे वायूप्रदूषण वाढून पर्यावरणावरही विपरीत परिणाम होतो. ध्वनीप्रदूषणामुळे नागरिकांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि इतर आपत्कालीन सेवांनाही वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसतो. अनेकदा काही मिनिटांचा विलंबही जीवावर बेतू शकतो. या समस्येवर उपाय शोधण्यासाठी प्रशासन आणि नागरिक या दोघांनीही जबाबदारीने वागण्याची गरज आहे. शहरांच्या भविष्यातील वाढीचा विचार करून रस्ते आणि वाहतूक व्यवस्थेचे दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक आहे. सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम, सुरक्षित आणि सुलभ करण्यावर भर दिला पाहिजे. शहरांमध्ये पुरेशा पार्किंग सुविधा उपलब्ध करून देणे, अतिक्रमणांवर कठोर कारवाई करणे आणि वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे. नागरिकांनीही वाहतुकीचे नियम पाळणे, अनावश्यक वाहन वापर टाळणे, शक्य असल्यास सार्वजनिक वाहतूक किंवा सामायिक प्रवासाचा पर्याय स्वीकारणे आवश्यक आहे. बाजारपेठा आणि प्रमुख चौकांमध्ये शिस्तबद्ध पार्किंगची सवय लावल्यास वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल. वाहतूक पोलिसांवर संपूर्ण जबाबदारी ढकलून चालणार नाही; कारण ही समस्या समाजाच्या एकत्रित सहभागातूनच सोडविता येणार आहे. वाढत्या शहरांच्या विकासाचा पाया सक्षम पायाभूत सुविधांवर अवलंबून असतो. वाहतूक कोंडी ही केवळ गैरसोयीची बाब नसून ती विकासाच्या गतीला खीळ घालणारी समस्या आहे. त्यामुळे आज योग्य नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणी झाली तरच उद्याची शहरे अधिक सुटसुटीत, सुरक्षित आणि गतिमान बनू शकतील.

# विधानसभा सभागृहाबद्दल चुकीची वक्तव्य करणे अशोभनीय - घोरपडे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर नगरपरिषदेच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेतील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा आमदार अमोल खताळ यांनी पावसाळी अधिवेशनात उपस्थित केल्यानंतर त्यावरून सुरू झालेल्या वादात आता शिवसेना-महायुतीने उडी घेतली आहे. संगमनेर नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षांनी विधानसभेबाबत केलेल्या कथित अवमानकारक वक्तव्याचा शिर्डी लोकसभा शिवसेना-महायुती तसेच संगमनेर तालुका महायुतीच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला आहे. राज्याच्या सर्वोच्च असणाऱ्या विधानसभा सभागृहाबद्दल अशा प्रकारचे वक्तव्य करणे अशोभनीय असून, हा सभागृहाचा अवमान असल्याची टीका शिवसेनेचे जिल्हा संघटक व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य विठ्ठल घोरपडे यांनी केली आहे.

घोरपडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की विधानसभे च्या पावसाळी अधिवेशनात आमदार अमोल खताळ यांनी संगमनेर विधान सभा मतदारसंघातील विविध लोक हिताच्या प्रश्नांची प्रभावीपणे मांडणी केली.शेतकऱ्यांचा पीकविमा, वीज पुरवठा,आरोग्य, शिक्षण, ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी आवश्यक निधी तसेच तालुक्याच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित अनेक महत्त्वाचे विषय विधानसभेत उपस्थित करून त्यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधले. त्यामुळे तालुक्यातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असल्याचेही त्यांनी नमूद केले.

संगमनेरकरांच्या विविध समस्या आणि अपेक्षा थेट राज्याच्या सर्वोच्च सभागृहापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम आमदार खताळ यांनी केले आहे. विशेषतः संगमनेर नगरपरिषदेच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेतील कथित भ्रष्टाचाराची उच्च स्तरीय चौकशी करण्याची मागणी विधानसभेत करून त्यांनी या गंभीर विषयाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष वेधले, असे घोरपडे यांनी म्हटले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या योजनेबाबत विविध स्तरांवर चर्चा सुरू असताना हा विषय थेट विधानसभेत मांडल्या मुळे तालुक्यातील नागरिकांच्या भावना व्यक्त झाल्या आहेत. गेल्या चार दशकांतील विकासकामांबाबत नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांना न्याय मिळावा ही सर्वसामान्य जनतेची अपेक्षा होती.त्यानुसार लोक प्रतिनिधी म्हणून आमदार अमोल खताळ यांनी सर्वसामान्य जनतेच्या भावना विधानसभेत मांडल्याबद्दल शिवसेना-महायुतीच्या वतीने त्यांचे अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात येत असल्याचेही घोरपडे यांनी पत्रकात म्हटले आहे.


विधानसभेसारख्या राज्याच्या सर्वोच्च असणाऱ्या सभागृहाबद्दल कोणत्याही जबाबदार व्यक्तीने अवमानकारक वक्तव्य करणे योग्य नसून, लोकशाही संस्थांचा सन्मान राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचेही विठ्ठल घोरपडे यांनी स्पष्ट केले.

# ५ जुलै रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

अहिल्यानगर, दि. १० जुलै : जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर आणि कै. माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा बुधवार, दि. १५ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत कै. माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुरुडगाव रोड, अहिल्यानगर येथे भरविण्यात येणार आहे. या मेळाव्यात अहिल्यानगर, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर येथील सुमारे १० ते १५ नामांकित कंपन्या सहभागी होणार असून, त्या थेट मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करणार आहेत. ऑटोमोबाईलसह विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी या माध्यमातून उपलब्ध होणार आहेत. एसएससी एचएससीआयटीआय तसेच सर्व शाखांतील पदवीधर (बी.ए., बी.कॉम., बी.एससी., अभियांत्रिकी) आणि पदविकाधारक (डिप्लोमा) उमेदवार या मेळाव्यासाठी पात्र आहेत. इच्छुक उमेदवारांनी रोजगाराच्या या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी त्वरित नोंदणी करावी. उमेदवारांनी **rojgar.mahaswayam.gov.in** या संकेतस्थळावर किंवा गुगल फॉर्मद्वारे आपली नोंदणी करावी. अधिक

# पावसाने खुलले कळमजाईचे निसर्ग सौंदर्य



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील घारगावजवळ निसर्गाच्या कुशीत वसलेल्या कळमजाई देवीच्या धबधब्याने मुसळधार पावसानंतर मनमोहक रूप धारण केले आहे. उंच कड्यावरून कोसळणारा शुभ्र धबधबा आणि चारही बाजूंनी पसरलेली गर्द हिरवाई यामुळे हा परिसर सध्या निसर्गप्रेमींसाठी प्रमुख आकर्षण ठरत आहे.

घारगाव तसेच पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गापासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या या ठिकाणी डोंगरात कोरलेले पांडवकालीन कळमजाई देवीचे मंदिर भाविकांसह ग्रामस्थांचे श्रद्धास्थान आहे.

पावसाळा सुरू होताच मंदिरालगतचा धबधबा प्रवाही होतो आणि त्याच्या मनोहारी सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी विविध भागांतून पर्यटक येथे दाखल होतात. अनेक शाळांच्या शैक्षणिक सहलींचेही हे आवडते पर्यटनस्थळ आहे.

वनविभागाने कळमजाई परिसराला निसर्ग पर्यटन स्थळ म्हणून विकसित केले असून येथे टेहळणी मनोरे, सुरक्षित पोहण्यासाठी तलाव, संरक्षक जाळ्या आणि पर्यटकांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या परिसरात बिबटे, तरस, मोर तसेच विविध वन्य पक्षी आणि विविध औषधी वनस्पतींचाही अधिवास असल्याने जैवविविधतेची समृद्ध झलक येथे अनुभवायला मिळते.

यंदाच्या मुसळधार पावसामुळे मंदिराच्या वरच्या भागातील ओढे, नाले आणि सिमेंट बंधारे तुडुंब भरून वाहत आहेत. या सर्व पाण्याचा प्रवाह एकवटून उंच कड्यावरून कोसळणारा धबधबा पर्यटकांना अक्षरशः भुरळ घालत आहे. उंचावरून फेसाळत कोसळणारा धबधबा, हिरव्यागार डोंगररांगा आणि अधूनमधून कानावर पडणारा मोरांचा मंजुळ आवाज यामुळे संपूर्ण परिसर एखाद्या स्वर्गीय निसर्गचित्राची अनुभूती देत आहे. पावसाळ्यात कुटुंबीयांसह, मित्रपरिवारासोबत किंवा छायाचित्रणाची आवड असलेल्या पर्यटकांसाठी कळमजाई देवीचा परिसर ही एक अविस्मरणीय पर्वणी ठरत असून, निसर्ग जणू प्रत्येकाला आपल्या सान्निध्याची प्रेमळ साद घालत आहे.


**पाहिजेत**

पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.

चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर

– संपर्क –
8888808397

**पाहिजेत**

सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८

संपर्क– जाधव सोनोग्राफी सेंटर
मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

**पाहिजेत**

मॉम-एबल फर्टिलिटी अँड आयव्हीएफ सेंटर, संगमनेर

आरएमओ (महिला) – १
शैक्षणिक पात्रता : BAMS / BHMS
नर्सिंग स्टाफ (रात्रपाळी) – १
हाऊसकीपिंग मावशी – २
घर कामासाठी मावशी – १
(सकाळी ९ ते सायंकाळी ५)

— संपर्क —
9860477807

**पाहिजेत**

हिशोब करण्याकरिता दोन मुले पाहिजे
(कॉम्प्युटर येणे आवश्यक)

ए. जी. एस. टोमॅटो सप्लायर्स
टोमॅटो मार्केट यार्ड, संगमनेर
दुकान क्रमांक : १२३४५
7741816770
9763531663

**पाहिजेत**

आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**

प्रो-माईन्ड एआय आयटी ट्रेनिंग इन्स्टिट्यूटसाठी त्वरित दोन जागा भरणे आहे.
(B.E Comp/IT, BCA/BCS)
— संपर्क —
8282825818

**पाहिजेत**

ड्रायव्हर - २ (एल.एम.व्ही.)
क्लर्क - २ (पदवीधर )
अकाउंटट - २ (टॅली)
कॅाम्प्युटर ऑपरेटर -२ पदवीधर
डॉ. इथापे हॉस्पिटल, संगमनेर
9822791484
9518556933
9370017177

**ड्रायव्हार पाहिजे**

ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअरल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
– संपर्क –
9117175050


# पान १ वरून - युसुफ चौगुले याच्यावर तात्काळ 'मकोका'...

२५(१)(अ) आणि २७ अंतर्गत गुन्हे दाखल असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, ९ जुलै २०२६ रोजी पहाटे कऱ्हे घाटात घडलेल्या अपघाताने या प्रकरणाला आणखी एक गंभीर वळण मिळाले. नाशिकहून संगमनेरच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या टोयोटा इनोव्हा (क्र. एमएच-०१/बीबी-९१४९) या कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन घाटातील सुरक्षा कठड्यांना धडकून दरीत कोसळले. अपघातानंतर स्थानिक नागरिक व वाहनचालकांनी जखमींना बाहेर काढून उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले.

घटनेची माहिती मिळताच तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिकच्या गोण्या आढळल्या. पुढील पाहणीत या गोण्यांमध्ये गुटखा आणि सुगंधी तंबाखूचा मोठा साठा असल्याचे स्पष्ट झाले. अपघातामुळे वाहनाच्या काचा फुटल्याने तब्बल २० ते २५ गोण्यांमध्ये हा माल भरलेला असल्याचे उघडकीस आले.

यानंतर वाहनाची पार्श्वभूमी तपासली असता या वाहनाचा संबंध युसुफ दादा चौगुले याच्याशी असल्याचे समोर आल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. वारंवार विविध गुन्हेगारी प्रकरणांत नाव समोर येत असूनही संबंधित व्यक्ती यंत्रणांचा गैरफायदा घेत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुटखा तस्करीतील आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंध अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यानुसार विभागीय उपायुक्तांनीही आपल्या कार्यक्षेत्रातील जिल्हा पोलीस प्रमुखांना अधिकृत पत्र देऊन अशा प्रकरणांमध्ये कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत या प्रकरणातही त्याच धर्तीवर कारवाई होणे आवश्यक असल्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, आरोपीमुळे पीडित अल्पवयीन मुलीचे कुटुंबीय तसेच या प्रकरणात पाठपुरावा करणारे पठार भागातील विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाचे पदाधिकारी यांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधितांना योग्य पोलीस संरक्षण देण्यात यावे आणि मुख्य आरोपी युसुफ दादा चौगुले याला तात्काळ ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध मकोका अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेचे विशाल भगवान वाकचौरे यांनी केली आहे.








**पाहिजेत**

श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

**पाहिजेत**

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**भाड्याने देणे**

संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत ( तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

**पाहिजेत**

वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397

# पेरणी पाण्यात... बळीराजा संकटात !

## पंचनामे करून तातडीने नुकसानभरपाईची मागणी



अकोले तालुक्यात गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या मुसळधार आणि संततधार पावसाने लिंगदेव, कोतूळ व ब्राह्मणवाडा महसूल मंडळातील शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. नुकतीच केलेली खरीप हंगामातील पेरणी अक्षरशः पाण्यात गेली असून अनेक शेतांमध्ये पाणी साचल्याने सोयाबीन, मका, भात तसेच कोबी, फ्लॉवर, टोमॅटो यांसारख्या नगदी पिकांचे बियाणे व रोपे कुजून नष्ट झाली आहेत. त्यामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी अकोले तहसीलदारांना निवेदन देत तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई जाहीर करण्याची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे की, यावर्षी मोठ्या आशेने कर्ज काढून किंवा साठवलेल्या पैशातून ट्रॅक्टरद्वारे मशागत, बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि इतर शेतीकामांवर मोठा खर्च करण्यात आला. मात्र निसर्गाच्या अवकृपेने काही दिवसांतच सर्व श्रम आणि पैसा वाया गेला. सततच्या पावसामुळे अनेक शेतांमध्ये गुडघाभर पाणी साचल्याने बियाणे उगवण्यापूर्वीच कुजले, तर उगवलेली रोपेही वाहून गेली.

अनेक ठिकाणी शेतबांध फुटल्याने सुपीक माती वाहून गेली असून शेतीचे मोठ्या प्रमाणावर धूप झाले आहे. परिणामी शेतकऱ्यांसमोर आता दुबार पेरणीचे मोठे संकट उभे ठाकले आहे. मात्र आधीच मोठा आर्थिक फटका बसल्याने दुबार पेरणीसाठी आवश्यक भांडवल उपलब्ध नसल्याची व्यथा शेतकऱ्यांनी मांडली आहे.

निवेदनात महसूल विभागाने तातडीने नुकसानग्रस्त शेतांची पाहणी करून पंचनामे करावेत, संबंधित गावांना अतिवृष्टीग्रस्त घोषित करावे, पीकविमा योजनेंतर्गत नुकसानभरपाई लवकरात लवकर मंजूर करावी तसेच दुबार पेरणीसाठी बियाणे आणि आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या निवेदनावर ४० हून अधिक शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून, निवेदनाची प्रत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनाही देण्यात आली आहे. लिंगदेव, कोतूळ आणि ब्राह्मणवाडा महसूल मंडळातील शेतकऱ्यांना तातडीने न्याय मिळावा, अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी शिवसेना (ठाकरे गट) उपतालुका प्रमुख प्रभाकर फापाळे यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, वेळेत पंचनामे झाले नाहीत आणि नुकसानभरपाई जाहीर झाली नाही, तर शेतकऱ्यांच्या न्यायासाठी तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल. नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीकडे शासनाने संवेदनशीलतेने पाहून तातडीने मदत करावी.

# सोशल मीडियावरील लाईव्ह लिलावातून कांदा उत्पादकांची फसवणूक ?

युवावार्ता (प्रतिनिधी)

घोडेगाव - सोशल मीडियावरील लाईव्ह लिलावाचा गैरवापर करून शेतकऱ्यांना जास्त भावाचे आमिष दाखवत मोठ्या प्रमाणावर कांदा बाजारात आणण्याचा आणि त्यानंतर पडत्या दरात माल खरेदी करण्याचा धक्कादायक प्रकार घोडेगाव उपबाजारात उघडकीस आला आहे. केवळ चार गोण्यांच्या कांद्याला तब्बल ४,२०० रुपये प्रतिक्विंटलचा भाव दाखवत सोशल मीडियावर कृत्रिम वातावरण निर्माण करण्यात आले. हा व्हिडिओ क्षणार्धात व्हायरल झाल्यानंतर अनेक शेतकऱ्यांनी अधिक भावाच्या आशेने बाजारात कांद्याची आवक वाढवली. मात्र, त्यानंतर शेकडो क्विंटल कांदा कमी दरात खरेदी झाल्याने शेतकऱ्यांची मोठी आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप होत आहे.

या प्रकारात लिलावावेळी प्रमुख व्यापारी अनुपस्थित असल्याचे, तर काही आडतेच स्वतः खरेदीदार बनून 'रिंग' करून लिलाव प्रक्रिया नियंत्रित करत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत बाजार समिती प्रशासनाने तीन संशयित आडतदारांना नोटीस बजावत चौकशी सुरू केली असून काही काळ त्यांची दुकानेही बंद ठेवण्यात आली होती.

आजच्या डिजिटल युगात बाजार समित्यांमधील लिलावाचे व्हिडिओ सोशल मीडियावर थेट प्रक्षेपित केले जातात. यामागील उद्देश शेतकऱ्यांना घरबसल्या बाजारभावाची अचूक माहिती मिळावी, लिलाव प्रक्रिया पारदर्शक व्हावी आणि योग्य निर्णय घेता यावा हा आहे. मात्र, घोडेगावातील ४,२०० रुपयांच्या भावाचा व्हिडिओ उलट शेतकऱ्यांसाठी 'डिजिटल ट्रॅप' ठरल्याची चर्चा सुरू झाली आहे.

सोमवारी राज्यातील इतर प्रमुख बाजार समित्यांमध्ये उच्च प्रतीच्या कांद्याला ३,००० ते ३,२०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळत असताना, घोडेगावातील ४,२०० रुपयांच्या भावाचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने इतर बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. आपल्याच बाजारात कमी भाव दिला जातोय का? या शंकेने अनेकांनी कांदा विक्रीसाठी घोडेगावकडे मोर्चा वळवला. परिणामी आवक प्रचंड वाढली आणि त्याचाच फायदा घेत हजारो क्विंटल कांदा पडत्या दरात खरेदी करण्यात आल्याचा आरोप होत आहे.

या प्रकारामुळे सोशल मीडियावरील लाईव्ह लिलावाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# बंदी झुगारून कळसुबाई गाठली

## पुराच्या विळख्यात अडकलेल्या पर्यटकांना ग्रामस्थांनी काढले बाहेर

युवावार्ता (प्रतिनिधी)

प्रशासनाने पर्यटनासाठी स्पष्ट प्रवेशबंदी लागू केलेली असतानाही नियमांना हरताळ फासत कळसुबाई शिखर गाठण्याचा हट्ट नऊ पर्यटकांच्या जीवावर बेतला. मुसळधार पावसामुळे कृष्णवंती नदीला अचानक आलेल्या महापुरात हे सर्व पर्यटक अडकले. मृत्यू समोर उभा ठाकल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र बारी गावातील धाडसी ग्रामस्थांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून दोरीच्या सहाय्याने थरारक बचावमोहीम राबवत सर्व नऊ पर्यटकांना सुखरूप बाहेर काढले.

भंडारदरा पाणलोट क्षेत्रात गेल्या आठवड्यापासून मुसळधार पाऊस सुरू असून नद्या-ओढे दुथडी भरून वाहत आहेत. संभाव्य धोका लक्षात घेऊन प्रशासनाने दोन दिवसांपूर्वीच कळसुबाई शिखर, भंडारदरा परिसर आणि इतर पर्यटनस्थळांवर पर्यटकांच्या प्रवेशावर बंदी घातली होती. तरीही काही हौशी पर्यटकांनी प्रशासनाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करत कळसुबाईकडे मोर्चा वळविला.

शिखरावरून परत येत असताना पायथ्याशी वाहणाऱ्या कृष्णवंती नदीच्या पाण्याने अचानक रौद्ररूप धारण केले. काही क्षणांतच पाण्याची पातळी वाढल्याने पर्यटक चारही बाजूंनी पुराच्या विळख्यात अडकले. सुटकेचा कोणताही मार्ग उरला नव्हता आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले.



घटनेची माहिती मिळताच बारी ग्रामपंचायत सदस्य त्र्यंबक खाडे, कुंडलिक खाडे, बाळू धनगर, जयराम खाडे, संतोष खाडे यांच्यासह ग्रामस्थांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. कमरेपर्यंतच्या वेगवान पाण्यात उतरून दोरीच्या सहाय्याने एकामागून एक अशा सर्व पर्यटकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. सकाळी सुमारे साडेअकरा ते बारा या कालावधीत ही जीवघेणी आणि थरारक बचावमोहीम यशस्वी पार पडली.

जीव वाचल्याने पर्यटकांनी ग्रामस्थांचे आभार मानले. मात्र स्वतःची नावे आणि गाव सांगण्यास त्यांनी टाळाटाळ केली. या घटनेनंतर एक गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे-प्रशासनाने स्पष्ट प्रवेशबंदी लागू केलेली असताना हे पर्यटक कळसुबाई परिसरात पोहोचलेच कसे? या प्रकारामुळे प्रशासनाच्या अंमलबजावणीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून परिसरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

स्थानिक नागरिकांनी पावसाळ्यात पर्यटनबंदीचे आदेश काटेकोरपणे पाळण्याचे आवाहन केले असून, अशा प्रकारचा निष्काळजीपणा भविष्यात मोठी जीवितहानी घडवू शकतो, असा इशाराही दिला आहे.

# साकूर - मांडवे राज्यमार्गावर जीवघेणे खड्डे

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे अपघातांचा धोका

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर, पारनेर आणि राहाता या तीन तालुक्यांना जोडणाऱ्या राज्य मार्ग क्रमांक ३६ व ६७ वरील साकूर-मांडवे दरम्यानच्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांचे जीव धोक्यात आले आहेत. सततच्या पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांचा अंदाज येत नसल्याने दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांच्या अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.



नगर-मनमाड महामार्गाच्या सुरू असलेल्या कामामुळे संगमनेरहून नगर व पारनेरकडे जाणाऱ्या वाहनांसाठी साकूर-मांडवे हा महत्त्वाचा पर्यायी मार्ग ठरला आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतुकीत मोठी वाढ झाली असली तरी रस्त्याची दुरवस्था वाहनचालकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. खड्डे चुकवत प्रवास करताना अनेकांना जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत आहे.


राज्यमार्गावरील साईडपट्ट्यांचीही अवस्था अत्यंत खराब झाली असून अनेक ठिकाणी रस्ता खचल्याचे चित्र आहे. काही दिवसांपूर्वी याच मार्गावर झालेल्या भीषण अपघातात श्रीगोंदा येथील एका तरुणाचा मृत्यू झाला होता. ही घटना ताजी असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कायमस्वरूपी दुरुस्तीची कोणतीही प्रभावी उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

काही महिन्यांपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने खड्डे बुजविणे आणि साईडपट्ट्यांची तात्पुरती दुरुस्ती केली होती. मात्र पहिल्याच पावसात ही दुरुस्ती उखडून गेल्याने कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. सध्या पावसामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली असून विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग जीवघेणा ठरत आहे.

एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वीच सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने खड्डे बुजवून रस्त्याची दर्जेदार व कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी वाहनचालक, ग्रामस्थ आणि नागरिकांकडून केली जात आहे.

भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रऊफ शेख यांनी प्रत्यक्ष या राज्यमार्गाची पाहणी करून संगमनेर व पारनेर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आहे. या मार्गावरील धोकादायक खड्डे तातडीने बुजवून नागरिकांना सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे केली.

# डिजिटल जगात घाई करू नका...



आजचे जग हे वेगवान आणि तंत्रज्ञानाधारित झाले आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया आणि ऑनलाइन व्यवहारांनी आपल्या दैनंदिन जीवनात मोठी क्रांती घडवून आणली आहे. घरबसल्या बँकिंग, खरेदी, शिक्षण, सरकारी सेवा आणि संवादाची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे जीवन अधिक सोयीचे झाले आहे. मात्र, या डिजिटल सुविधांसोबत काही गंभीर धोकेही वाढले आहेत. विशेषतः घाईघाईने घेतलेले निर्णय अनेकदा आर्थिक, सामाजिक आणि मानसिक नुकसान करून जातात. त्यामुळे डिजिटल जगात वावरताना संयम, सतर्कता आणि पडताळणी अत्यंत आवश्यक आहे.

आजच्या युगात माहितीचा प्रचंड वेग आहे. सोशल मीडियावर एखादी बातमी, व्हिडिओ किंवा संदेश काही क्षणांत लाखो लोकांपर्यंत पोहोचतो. परंतु प्रत्येक माहिती खरीच असेल असे नाही. अनेक वेळा अफवा, दिशाभूल करणारे संदेश किंवा बनावट माहिती मोठ्या प्रमाणावर प्रसारित केली जाते. कोणतीही माहिती सत्यता पडताळल्याशिवाय पुढे पाठविणे समाजात गैरसमज आणि तणाव निर्माण करू शकते. त्यामुळे फॉरवर्ड करण्यापूर्वी विचार करा हा मंत्र प्रत्येकाने लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या वापरामुळे सायबर फसवणुकीचे प्रकारही झपाट्याने वाढत आहेत. मोबाईलवर येणारे बनावट फोन कॉल, बँकेच्या नावाने येणारे संदेश, खोट्या लिंक्स आणि बनावट वेबसाइट्सच्या माध्यमातून नागरिकांची फसवणूक केली जाते. अनेकदा लोक घाईघाईने ओटीपी, बँक खात्याचा तपशील किंवा पासवर्ड शेअर करतात आणि त्यानंतर त्यांच्या खात्यातील रक्कम काही क्षणांत गायब होते. अशा घटना टाळण्यासाठी कोणतीही लिंक उघडण्यापूर्वी तिची खातरजमा करणे आणि वैयक्तिक माहिती कोणालाही न देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

ऑनलाइन खरेदी करतानाही सावधगिरी आवश्यक आहे. आकर्षक ऑफर्स, मोठ्या सवलती आणि कमी किंमतीच्या आमिषाला बळी पडून अनेक ग्राहक फसवणुकीचे शिकार होतात. काही वेबसाइट्स पैसे घेतल्यानंतर वस्तू पाठवत नाहीत, तर काही ठिकाणी निकृष्ट दर्जाच्या वस्तू दिल्या जातात. त्यामुळे खरेदी करण्यापूर्वी विक्रेत्याची विश्वासार्हता, ग्राहकांचे अभिप्राय आणि वेबसाइटची सत्यता तपासणे आवश्यक आहे.

सोशल मीडियाच्या वापरातही घाई आणि उतावळेपणा नुकसानकारक ठरू शकतो. रागाच्या भरात केलेली पोस्ट, अपमानास्पद टिप्पणी किंवा चुकीची माहिती शेअर केल्यामुळे सामाजिक संबंध बिघडू शकतात आणि कायदेशीर अडचणीही निर्माण होऊ शकतात. इंटरनेटवर एकदा टाकलेली माहिती कायमस्वरूपी नोंदली जाते, त्यामुळे कोणतीही पोस्ट किंवा प्रतिक्रिया देण्यापूर्वी विचार करणे गरजेचे आहे.

तरुण पिढी आणि विद्यार्थ्यांसाठी डिजिटल जग मोठ्या संधी घेऊन आले आहे. शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या अनेक संधी ऑनलाइन उपलब्ध आहेत. मात्र, याचबरोबर ऑनलाइन गेम्स, सोशल मीडिया आणि मनोरंजनाच्या अतिरेकामुळे वेळेचा अपव्यय आणि मानसिक ताण वाढण्याचा धोका आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर साधन म्हणून करणे आवश्यक आहे, जीवनाचा केंद्रबिंदू म्हणून नव्हे.

डिजिटल जगातील आणखी एक मोठे आव्हान म्हणजे गोपनीयता आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण. अनेक ॲप्स आणि वेबसाइट्स वापरकर्त्यांची माहिती गोळा करतात. त्यामुळे कोणतेही ॲप डाउनलोड करताना त्याच्या परवानग्या आणि अटी समजून घेणे आवश्यक आहे. आपल्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण ही प्रत्येकाची स्वतःची जबाबदारी आहे.

तंत्रज्ञान हे माणसाच्या प्रगतीसाठी अत्यंत उपयुक्त साधन आहे, परंतु त्याचा वापर विवेकाने आणि जबाबदारीने करणे तितकेच आवश्यक आहे. डिजिटल जगात वेग महत्त्वाचा असला तरी सुरक्षितता आणि सत्यता यांना अधिक महत्त्व आहे. एका क्षणाची घाई कधी कधी मोठ्या नुकसानाचे कारण ठरू शकते. म्हणूनच डिजिटल युगातील प्रत्येक नागरिकाने एक गोष्ट कायम लक्षात ठेवली पाहिजे - विचार करा, पडताळा आणि मगच क्लिक करा. संयम, सतर्कता आणि जबाबदारी यांच्याच आधारावर डिजिटल जगातील प्रवास सुरक्षित आणि यशस्वी होऊ शकतो.

# भारत पेट्रोलियमकडून सिद्धार्थ विद्यालयाला आरओ भेट



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड यांच्यावतीने सिद्धार्थ विद्यालय, संगमनेर येथे स्वच्छता पंधरवडा ( १ते१५ जुलै २०२६)यानिमित्ताने विशेष कार्यक्रम संपन्न झाला. स्वच्छतेची सवय ही आयुष्यभर प्रत्येक व्यक्तींना उपयोगी पडत असते. भारताच्या समृद्धतेसाठी निरुपयोगी वस्तूंचे व्यवस्थापन आणि पुनर्वापर अत्यंत आवश्यक बाब आहे, असे प्रतिपादन भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेडच्या अहिल्यानगर विभागाच्या सेल्स ऑफिसर हर्षा मॅडम यांनी केले. याप्रसंगी चैतन्य पेट्रोलियम पंपाचे प्रमुख सुनील नवले यांनीही विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या निमित्ताने त्याचबरोबर स्वच्छता पंधरवाडा या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी सागर मांडगे यांचीही उपस्थिती होती.

सिद्धार्थ विद्यालयामध्ये भारत पेट्रोलियमच्यावतीने वक्तृत्व, निबंध आणि चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि कचऱ्याचा पुनर्वापर असे या स्पर्धेसाठी विषय होते. इयत्ता पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी अशा दोन गटात संपन्न झालेल्या स्पर्धेतील एकूण ३६ विजेत्या स्पर्धकांना स्कूल बॅग आणि वॉटर बॉटल बक्षिसे दिली. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यालयाच्या प्रांगणात हर्षा मॅडम, सुनील नवले यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना आरोग्यपूर्ण स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी आर. ओ . जलशुद्धीकरण यंत्र भेट देण्यात आले. या नवीन आर. ओ. चे उद्घाटन याप्रसंगी हर्ष मॅडम, सुनील नवले आणि विद्यार्थ्यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. प्रस्तुत कार्यक्रमाने विद्यार्थ्यांना संघभावना, कला अभिव्यक्ती, प्रत्यक्षकृती करणे, विविध कलांचे सादरीकरण, पर्यावरणाची जाणीव अशा विविध समृद्ध अनुभवांचा लाभ घेता आला. कार्यक्रमाच्या समारोपसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी सहा वह्या, कलर किट, जॉमेट्री किट आणि दोन पेन भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड च्यावतीने देण्यात आले. सिद्धार्थ विद्यार्थी वसतिगृह, रमा यशोधरा विद्यार्थिनी आश्रम आणि गोकुळ या तीनही विभागातील मुलांना यानिमित्ताने शैक्षणिक साहित्याची भरीव मदत या निमित्ताने झाली आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक आर.एम. जगताप, प्रकाश पारखे ,बाळासाहेब राऊत, तुषार थिटे ,गर्जना गांगुर्डे, सीमा वाघ, सुशांत रूपवते ,दत्तात्रय गोफणे, नंदू भालारे , सुनील यादव ,आलेस पंडित यांनी विशेष परिश्रम घेतले.

पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जड्ड डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी
क्लॉथ सेंटर सिल्क अँण्ड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपुर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरुम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

## अहिल्यानगरचा अभिमान

# रामचंद्र जायभाये महाराष्ट्र-गोवा डाक सर्कलपदी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - पाथर्डी तालुक्यातील येळी (जि. अहिल्यानगर) येथील सुपुत्र तथा भारतीय डाक सेवेतील (IPoS) १९९९ बॅचचे वरिष्ठ अधिकारी रामचंद्र किसन जायभाये यांची महाराष्ट्र व गोवा सर्कलचे मुख्य पोस्टमास्तर जनरल (Chief Postmaster General) म्हणून नियुक्ती झाली आहे. महाराष्ट्र व गोवा सर्कलच्या सर्वोच्च पदावर विराजमान होणारे ते अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिले अधिकारी ठरले आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आनंदाचे वातावरण आहे.



रामचंद्र जायभाये हे यापूर्वी पोस्टल संचालनालय, नवी दिल्ली येथे जनरल मॅनेजर म्हणून कार्यरत होते. त्यांनी भारतीय डाक विभागात देशभरात प्रवर डाक अधीक्षक, निदेशक, पोस्टमास्तर जनरल आदी महत्त्वाच्या पदांवर उल्लेखनीय सेवा बजावली आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण पाथर्डी तालुक्यातील येळी येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. त्यानंतर त्यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथून कृषी अभियांत्रिकीमध्ये बी.टेक. पदवी प्राप्त केली. पुढे आयआयटी खरगपूर येथून १९९८ मध्ये एम.टेक. पूर्ण केले. सन १९९९ मध्ये णझडउ परीक्षा उत्तीर्ण होत अखिल भारतीय स्तरावर ३५२ वा क्रमांक मिळवून त्यांची भारतीय डाक सेवेत (खझेड) निवड झाली.

नियुक्तीनंतर आपल्या भावना व्यक्त करताना रामचंद्र जायभाये म्हणाले, केंद्र सरकारच्या जनकल्याणकारी योजना तळागाळापर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे, तसेच बँकिंग, डाक जीवन विमा, मेल, पार्सल आणि नागरिक केंद्रित सेवा अधिक सक्षम करून सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी महाराष्ट्र व गोवा डाक सर्कल कटिबद्ध राहील. जिल्हा परिषद शाळेतून शिक्षण घेत डाक विभागातील सर्वोच्च प्रशासकीय पदांपैकी एका पदापर्यंतचा त्यांचा प्रवास हा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, जिद्द, मेहनत आणि गुणवत्तेच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, याचे त्यांनी उत्तम उदाहरण घालून दिले आहे.

# संगमनेर-अकोलेकरांची आरटीओसाठीची गैरसोय दूर होणार

## आ. खताळांच्या पाठपुराव्याला यश

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर व अकोले तालुक्यातील नागरिकांची परिवहन विभागाशी संबंधित कामांसाठी वर्षानुवर्षे होणारी गैरसोय आता दूर होण्याच्या मार्गावर आहे. आमदार अमोल खताळ यांनी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, संगमनेर येथे लवकरच उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू होणार आहे. चाळीस वर्षांत जे शक्य झाले नाही, ते आमदार अमोल खताळ यांनी अवघ्या दीड वर्षात करून दाखवले आहे. मात्र, काहीजण या कामाचे खोटे श्रेय घेण्याचा प्रयत्न करत असल्याची टीकाही आमदार खताळ यांनी केली.

मुंबई येथील मंत्रालयात परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत संगमनेर येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. आमदार खताळ यांनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि संगमनेर व अकोले तालुक्यातील नागरिकांची गरज लक्षात घेऊन परिवहन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करून कार्यालय मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

सध्या संगमनेर व अकोले तालुक्यातील नागरिकांना वाहन नोंदणी, ड्रायव्हिंग लायसन्स, फिटनेस प्रमाणपत्र, वाहन परवाने (परमिट), वाहन मालकी हक्क हस्तांतरण तसेच इतर आरटीओच्या कामांसाठी अहिल्यानगर किंवा अन्य ठिकाणी जावे लागत होते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम वाया जात होते. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू झाल्यानंतर ही सर्व कामे संगमनेरमध्येच होणार असल्याने दोन्ही तालुक्यांतील लाखो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

तालुक्यातील वाढती लोकसंख्या आणि वाहनसंख्या लक्षात घेता उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची आवश्यकता अनेक वर्षांपासून होती. या मागणीसाठी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. आता हा प्रस्ताव अंतिम टप्प्यात पोहोचला असून, लवकरच त्याला अधिकृत मंजुरी मिळून कार्यालय कार्यान्वित होईल. त्यामुळे नागरिकांची प्रवासाची गैरसोय, प्रशासकीय अडचणी आणि अनावश्यक खर्च मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. मात्र, काहीजण फुकटचे श्रेय घेण्यात माहीर असून सोशल मीडियावर नौटंकी करण्यातच नेहमी अग्रेसर असतात, अशी टीकाही आमदार अमोल खताळ



### आ. खताळ यांनी केला पाठपुरावा

**२३ जानेवारी २०२५ : परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे पत्राद्वारे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची मागणी. २० फेब्रुवारी २०२५ : राज्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (निरीक्षण) यांनी अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन विभागाला सविस्तर अहवाल सादर करण्याचे पत्र दिले. २१ मार्च २०२५ : या विषयावर सविस्तर आढावा बैठक घेण्यात आली. २४ मार्च २०२५ : परिवहनमंत्री प्रताप सरनाईक व वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.**

**५ जून २०२५ : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे मागणी; त्यांनी परिवहनमंत्र्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. २५ ऑगस्ट २०२५ : संगमनेर येथील आभार यात्रेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संगमनेरसाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याचे आश्वासन देत परिवहन विभागाला आवश्यक त्या सूचना दिल्या. १ जुलै २०२६ : परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी अधिकाऱ्यांकडून प्रस्तावाबाबत विचारणा करून नवीन धोरणानुसार मंजुरीबाबत सूचना दिल्या.**

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# भीज पावसानंतरही संगमनेरची तहान कायम

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यात गेल्या चार ते पाच दिवसांपासून भीज पाऊस सुरू असला, तरी पाणीटंचाईचे संकट अद्यापही कायम आहे. अनेक छोटे-मोठे तलाव, सिमेंट बंधारे आणि विहिरी पूर्ण क्षमतेने भरल्या नसल्याने पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीरच आहे. परिणामी, तालुक्यात सध्या १५ टँकरद्वारे २६ गावे, १६ गावठाणे आणि ६६ वाड्या-वस्त्यांतील तब्बल ३५ हजार ४५३ नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे.

जुलै महिन्याचे नऊ दिवस उलटून गेले असले, तरी तालुक्यात अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. गेल्या काही दिवसांत सर्वदूर भीज पाऊस झाला असला, तरी जलसाठ्यांमध्ये अपेक्षित वाढ झालेली नाही. काही भागांत चांगला पाऊस झाल्याने दिलासा मिळाला असला, तरी अनेक गावांमध्ये पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने तलाव, बंधारे आणि विहिरी अजूनही कोरड्याच आहेत. त्यामुळे अनेक गावांची तहान अजूनही टँकरच्या पाण्यावरच भागवावी लागत आहे.

तालुक्यातील पठारभागात पाणीटंचाईची तीव्रता सर्वाधिक असून, बहुतांश टँकर याच परिसरात सुरू आहेत. पावसाने अद्याप या भागाकडे पाठ फिरवल्याने नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. दुसरीकडे, मुळा नदीच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या दमदार पावसामुळे नदी दुथडी भरून वाहू लागली असून, नदीकाठच्या गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागला आहे.

दरम्यान, तालुक्यातील शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष आता जोरदार व सलग पावसाकडे लागले आहे. येत्या काही दिवसांत दमदार पाऊस झाल्यास जलसाठ्यांमध्ये वाढ होऊन टँकरवरील अवलंबित्व कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
किडनीच्या आजारांवर संगमनेरमध्ये परिपूर्ण उपचार
डायलिसीस उपलब्ध सुविधा
अत्याधुनिक मशिनरीद्वारे डायलिसीस
• 24x7 Technician
• One Time Blood Tubing Use
• Modern Dialysis Centre
• Nephrologist, AVF Surgery
• Renal Dialysis
• Dialysis Catheter Insertion
स्पेशालिस्ट - डॉ. नागेश अघोर (किडनीविकार तज्ज्ञ)
MBBS, MD, DNB, MNAMS
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
७०३८२७०३८२

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू । कांजीवरम । सिल्क पैठणी । बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25